
# जगद्‌ज्योती महात्मा

# श्री. बसवेश्वर



डॉ. न. म. जोशी

With Best Compliments from

KAKA HALWAI
FOODS PVT. LTD.

पुणे, पिंपरी-चिंचवड

Surendra R. Gadve
Senior Director
+91 9822036999
surendra@kakahalwai.com

# जगद्ज्योती महात्मा श्री. बसवेश्वर

डॉ. न. म. जोशी

मन-रंजन प्रकाशन, पुणे.

जगद्ज्योती महात्मा श्री. बसवेश्वर :

JAGADJOTI MAHATMA SHREE BASAVESHVAR

---


- © : डॉ. न. म. जोशी
- प्रथमावृत्ती : ६ मे २०१९ (अक्षय्यतृतीया)
- प्रकाशक :

  मन-रंजन प्रकाशन

  मनोहर आत्माराम सप्रे

  बी ६०३, स्वामीनारायण,

  सनसिटी रोड, पुणे-४११०४१.

  मोबाईल : ९९६०४८८७३८

  Email : monoharsaprepune@gmail.com
- अक्षरजुळणी : शुभांगी एन्टरप्रायजेस, पुणे.
- मुद्रक : एक्सेल प्रिंटर्स, पुणे.
- मुखपृष्ठ : संतोष कोंढेकर
- स्वागतमूल्य : ५०/- रुपये



जगत्ज्योती महात्मा श्री बसवेश्वर यांचा जन्म मधुवरस आणि मादलांबा या सदाचरणी शैव ब्राह्मण दांपत्याच्या पोटी झाला. पण पुढे क्रांतदर्शी बसवेश्वरांनी वीरशैव धर्माचा स्वीकार करून समतेचा ध्वज हाती घेतला. काही ग्रंथांमध्ये त्यांच्या आई-वडिलांची नाव माहिराज आणि महाम्बा अशी आहेत.

# मनोगत

'जगद्ज्योती महात्मा श्री बसवेश्वर' हे माझ्या एकूण ग्रंथलेखनातील पहिले पुस्तक! केवळ छत्तीस पानांची पुस्तिका. पण या पुस्तिकेनं माझ्या अक्षरब्रह्म उपासनेचं दालन मला उघडून दिलं आणि वेगवेगळे भाग्ययोग याच पुस्तकानं निर्माण केले. त्याचं असं झालं...

माझे ज्येष्ठ लेखकमित्र कै. शं.रा.देवळे यांच्यामुळे विदर्भ मराठा बुक कंपनीचे कै. अ. ज. प्रभु यांनी मला हे पुस्तक लिहायला लावले. भारताचे मानकरी अशा शंभर पुस्तकांचा संच ते प्रकाशित करणार होते. त्यातला हा एक मानकरी! वास्तविक मी काही संशोधक लेखक नव्हतो. पण मी ते आव्हान स्वीकारलं. केसरी ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. बर्वे यांनी मला वीरशैव मासिकाचे दहाबारा अंक काढून दिले. त्यातून श्रीबसवेश्वरांचं चरित्र मी घेतलं आणि छत्तीस पानांची पुस्तिका प्रकाशित झाली.

पुस्तक छोटं असलं तरी कै. प्रभु यांनी दोन पानी गुळगुळीत कागदावर त्याचं करारपत्र मात्र सुंदर रीतीने तयार करून घेतलं होतं.

मानधन एकमुठी पन्नास रुपये आणि पंधरा प्रती... या करारातील महत्त्वाच्या अटी होत्या.

अर्थातच मला मानधनापेक्षा त्या करारपत्राचं महत्त्व जास्त होतं. गारवडे (ता. पाटण) इथं गेलो होतो. त्या एका रात्री माझे सगळे गावकरी मित्र आमच्या अंगणात गोळा झाले होते. गॅसच्या बत्तीच्या प्रकाशात, वर आभाळात चांदण्या लुकलुकत दिसताना ते करारपत्र मधे ठेवून मी त्या माझ्या साध्याभोळ्या मित्रांना मी आता लेखक कसा होणार आहे हे त्या करारपत्राच्या रुपाने सांगत होतो. आणि ते आ

वासून कौतुकानं ऐकत होते. प्रत्येकाच्या डोक्यात 'आपला मित्र लेखक झाला' याचे कौतुक ओसंडत होते.

दुसऱ्या दिवशी सोमवार!

आणखी गंमत झाली. आमच्या गावी बहुळेश्वराचं सुंदर हेमाडपंथी मंदिर आहे. आम्ही तिथं नेहमीच शिवदर्शनाला जात असू. माझे एक चुलत काका कै. बाळासाहेब मोकाशी हे भिक्षुकी करीत असत. गावात भिक्षुकी किती चालणार! पण ते चारआठ आणे सुद्धा त्यांना खूप वाटायचे.

बाळूकाकांनी मला बहुलेश्वरी नेलं आणि ते करारपत्र सांबाच्या पिंडीसमोर ठेवून मला शंकराला अभिषेक करायला लावला. अभिषेकदक्षिणा म्हणून त्यांनी सव्वा रुपया घेतला. त्यांनी दक्षिणा मिळावी म्हणून त्यांनी हा खटाटोप केला होता. पण श्री बसवेश्वर या शिवभक्ताच्या पुस्तकासंबंधी माझा शिवालाच अभिषेक होऊन मी साहित्यातील 'सत्य शिव सुंदर' यांच्या प्रवासाला निघालो. कै. बाळूकाकांनी मला भरभरून आशीर्वाद दिला.

"या पुस्तकाच्या रुपानं साहित्यप्रांतात पदार्पण करतो आहेस, तुझ्या हातून खूप चांगलं लेखन होईल."

यथावकाश पुस्तक प्रकाशित होऊन त्याच्या पंधरा प्रती श्री. प्रभु यांनी मला पाठवल्या. नवा कपडा आणि नवे पुस्तक यांना एक रोमांचकारी सुगंध असतो. माझ्या पहिल्या पुस्तकाचा सुगंध घेत मी आनंदून गेलो होतो.

आणखी एक विलक्षण योगायोग!

मी त्यावेळी वाडा पद्धतीच्या चाळवजा जागेत राहात होतो. त्या वाड्यात एकेक खोल्या असलेली अनेक कुटुंबे होती. माझ्याकडे मात्र त्यातल्या त्यात मोठी जागा होती. एक हॉलही होता. आमच्या वाड्यातील कै. बळवंतराव जोशी यांच्याकडे एक लग्नसमारंभ होता. त्यांच्याकडे बरेच पाहुणे येणार होते. त्यापैकी एका व्ही. आय. पी. भिडे नावाच्या पाहुण्यांची झोपण्याची सोय माझ्या हॉलमध्ये होती. हे भिडे त्यावेळी कर्नाटक काँग्रेसचे मोठे पदाधिकारी होते. माझ्या टेबलावर त्यांनी हे बसवेश्वर पुस्तक पाहिलं आणि ते पुस्तक ते घेऊन गेले.

चार-पाच महिन्यांनी मला कर्नाटक शिक्षण खात्याचं पत्र आलं. 'कर्नाटकच्या द्विविध भाषा मराठी आठवीच्या पुस्तकात तुमच्या बसवेश्वर पुस्तकातील एक उतारा घेतला आहे. तुम्हाला प्रतिवर्षी पंधरा रु. मानधन देण्यात येईल. अनुमती कळवावी, अर्थातच मी अनुमती कळवली.

महाराष्ट्रातल्या मराठी पाठ्यपुस्तकातही माझा अजून प्रवेश झाला नव्हता. पण कर्नाटकच्या पाठ्यपुस्तकात मात्र मी केव्हाच जाऊन विराजमान झालो होतो. जवळजवळ पंधरा वर्षे तो धडा पाठ्यपुस्तकात होता. मला नियमित मानधन मिळत होते. मानधन अगदीच थोडं असलं तरी पाठावर लेखकाची ओळख देत असल्यामुळे मी महाराष्ट्राआधी हजारो विद्यार्थ्यांमुळे कर्नाटकाच्या ओळखीचा झालो. मिरज, जमखिंडी, उगार, या सीमेवरील गावांतून किंवा बेळगाव, हुमणाबाद यासारख्या मोठ्या गावांतूनही मला व्याख्यानांसाठी निमंत्रणे येऊ लागली.

'महात्मा बसवेश्वर या छोट्या पुस्तकाने हे भाग्ययोग निर्माण केले होते. पुण्यातील 'सकाळ' या वृत्तपत्राने लेखकांसाठी 'माझे पहिले पुस्तक' हे सदर सुरू केले होते. या सदरासाठी त्यांनी माझाही लेख आवर्जून मागून घेतला होता. पुढे लिंगायत समाजाच्या अनेक व्यक्तींकडून मला सांस्कृतिक कार्यक्रमासाठी निमंत्रणे येऊ लागली.

कर्नाटक सरकारचा पाठ्यपुस्तक लेखक म्हणून मी तिकडे कुठे प्रवासाला गेलो तर सरकारी डाकबंगल्यात मला अधिकृतपणे उतरण्याची सोय लाभली.

एका छोट्या पुस्तकानं असे योग आणले!

आणि आता माझेच कर्तबगार विद्यार्थी मित्र श्री. विलास रुकारी, श्री. सुरेंद्र गाडवे या पुस्तकाची नवी सुधारित आवृत्ती प्रकाशित करीत आहेत; हाही भाग्ययोगच!

**– डॉ. न.म. जोशी**

# अनुक्रमणिका


१. शुद्ध बीजापोटी ............ ९
२. बालपणांतील काळ सुखाचा ............ ११
३. शुभ-मंगल-सावधान ............ १३
४. कल्याण नगरीत बसवेश ............ १५
५. प्रधानपदावर बसवेश्वर ............ १८
६. राजा बिज्जल आणि बसवेश्वर ............ २१
७. ठिणगी भडकली ............ २४
८. नको ती राजधानी ............ २८
९. ज्योत मालवली ............ ३१
१०. बसवेश्वरांची शिकवण ............ ३३

# १. शुद्ध बीजापोटी

विजापुराजवळ एक छोटेसे गाव आहे. बागेवाडी त्याचे नाव. बागेवाडीत एक सुखवस्तु दांपत्य रहात होते- माहिराज आणि माहाम्बा. दोघेही अत्यंत सात्त्विक. वृत्तीने आणि कर्मानेही. दुष्टपणा कसा तो ठाऊक नाही. तामसीपणाचे नाव नाही. शैव पंथीय असल्याने कट्टर शिवभक्त होते. शिवाचे ध्यान झाल्याशिवाय तोंडात पाण्याचा टिपूस जायचा नाही. संपत्ती होती, संपत्तीमागे आपोआप मिळणारे सारे सुख होते. सात्त्विकतेमुळे सुख अधिकच शोभून दिसत होते. दुःख होते फक्त एकच- हे सारे सुख पहायला आणि वाढवायला घरात कोणी नव्हते. माजघरातला पाळणा वर्षानुवर्षे रिकामाच राहिला होता. पुत्रप्राप्तीसाठी साध्वी माहाम्बा झुरत होती. माहाम्बेचे दुःख पाहून माहिराज कष्टी होत होते. एकमेकांचे अश्रू पुसण्यात दोघेही समाधान मानीत राहिले. श्रीशिवाच्या सेवेत तल्लीन होत राहिले. अखेर एक सोनेरी दिवस उगवला. माहाम्बेने आपण आई होणार असल्याचे माहिराजाला सांगितले. माहिराज आनंदले. मुखावरच्या कष्टी सुरकुत्या संपल्या. समाधान दिसू लागले.

उदरातील गर्भ प्रतिदिनी वाढत होता. आणि माहाम्बा शिवध्यानात अधिकाधिक तल्लीन होत होती. त्या भविष्यांतील बाळावर शिवभक्तीचे संस्कार असे जन्मपूर्वकालापासून होत राहिले.

इ.स. ११२५ मधील अक्षय्यतृतीयेचा शुभ दिवस होता. माहिराजाच्या घरी आज स्वर्ग उतरला होता. घरात आणि उरात आनंद मावत नव्हता. माहाम्बा प्रसूत झाली होती. तिने एका तेजस्वी बाळाला जन्म दिला होता. सोऽहं कोऽहं असा गंभीर ध्वनि त्याच्या इवल्याशा मुखातून बाहेर

आला. माहाम्बेचा पान्हा वाहू लागला. माहिराज आनंदाने वेडा झाला. आकाशांतून सुरगणांनी पुष्पवृष्टी केली. बागेवाडी बहरून गेली.

नंदीचा कृपाप्रसाद म्हणून बाळाचे नाव 'बसव' ठेवण्यात आले. कानडी भाषेत नंदीला 'बसव' म्हणतात. याच बसव बाळाने पुढे आपल्या पराक्रमाने आणि कर्तृत्वाने आपल्या मातापित्यांना धन्य केले. शैवधर्माचा कोलमडणारा डोलारा त्याने धीराने आणि पराक्रमाने सावरला, वाढवला.

बसवेश्वरांच्या कर्तृत्वशाली आयुष्याचे फार मोठे श्रेय त्यांच्या मातापित्यांना द्यावे लागेल. खाण तशी माती. माहिराज आणि माहाम्बा या दोन्ही शिवभक्त, सज्जन, पापभीरू आणि धर्मशील मातापित्यांच्या पोटी जन्म घेणारे मूल पुढे तसेच न होते तर नवल. उदरात गर्भावस्थेत असतानाही शिवभक्तीचे सूर कानावर यावेत इतके भाग्य बसवेशांना लाभले होते. साहजिकच भविष्यकाळात ते एक मोठे कर्तृत्ववान धर्मप्रवर्तक म्हणून पुढे आले. 'संतवृत्तीच्या मातापित्यांचा पराक्रमी पुत्र या दृष्टीने बसवेशांची ही जन्मकथा पाहिल्यावर आपल्याला असेच म्हणावे लागेल, 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी.'

■

# २. बालपणांतील काळ सुखाचा

बालपण म्हणजे आनंद. बालपण म्हणजे हसणे-बागडणे. बालपण म्हणजे स्वातंत्र्य! बसवेश्वरांचे बाबतीत असेच होते. आपल्या विविध बाललीलांनी या छोट्या बसवबाळाने माहाम्बेच्या घरात नंदनवन निर्माण केले होते. गोंडस शरीर आणि तल्लख बुद्धिमत्ता या देवदत्त देणग्यांनी त्या बाललीला अधिकच शोभून दिसत.

मुलाच्या लडिवाळ कौतुकात आठ वर्षे कशी निघून गेली हे माहाम्बेला आणि माहिराजाला कळले पण नाही. बसव आता आठ वर्षांचा झाला होता. रुढीप्रमाणे त्याची मुंज करणे आवश्यक आहे हे माहिराजाच्या ध्यानात आले. एवढ्या अवधीत बसवेशांनी पुष्कळ चांगल्या चांगल्या गोष्टी आत्मसात केल्या होत्या. घरातील सारेच वातावरण धार्मिक आणि शिवभक्तिपर असल्याने त्याचाही परिणाम बसवेशांच्या संस्कारक्षम मनावर होत राहिला. माहिराजाने बसवेशांचा उपनयनसंस्कार करण्याचे ठरविले. मुहूर्त ठरला. आसपासच्या साऱ्या ब्राह्मण मंडळींना आमंत्रणे गेली. घरामध्ये गडबड सुरू झाली. एक दिवस माहिराजाकडे खूप ब्राह्मणमंडळी आली होती. विविध विषयांवर चर्चा चालू होती. बसव लक्षपूर्वक ती ऐकत होता. बसवाच्या उपनयनसंस्काराचा विषय निघाला. त्यावर ही मंडळी माहिराजासमवेत बोलू लागली.

एवढ्यात बसव निश्चयाने पुढे आला. त्याने साऱ्यांना स्पष्ट सांगितले की आपणास हा संस्कार करून घ्यावयाचा नाही. एवढेच नव्हे तर आठ वर्षांच्या त्या पोराने साठ वर्षांच्या थोरांना प्रश्न टाकला, ''संस्काराचे प्रयोजनच काय? संस्कारांनी आत्मशुद्धी होत असेल, तर आत्मा हा

सदैव शुद्धच आहे. शुद्धी ही गुरुपासून ज्ञान मिळवूनच होते.''

पोराच्या या विद्वत्ताप्रचुर बोलांनी थोर थक्क झाले. ब्राह्मणमंडळी दिङ्मूढ झाली. माहिराजाला मात्र फार अवघडल्यासारखे झाले. पण मनातून मात्र त्याला फारच आनंद झाला. मुलाच्या धिटाईचे माहिराजाने मनातल्या मनात अपार कौतुक केले आणि परमेश्वराला त्याने असंख्य धन्यवाद दिले.

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात असे म्हणतात, ते काही खोटे नाही. वयाच्या आठव्या वर्षी असा प्रखरपणा क्वचितच दिसून येतो. आपला मुलगा इतर सामान्य मुलांहून फार वेगळा आहे, नव्हे असामान्य आहे याचा प्रत्यय बसवेशांच्या आईवडिलांना आणि सभोवतालच्या लोकांना त्यावेळी आला.

इतर सामान्य मुलांना बालपणी खेळण्याबागडण्यातच सुख असते. पण बसवेशांना खेळण्याबरोबरच मननचिंतनाचा ध्यास होता. पुढेपुढे तर बसवेशांनी वेदांचे आणि वैदिक वाङ्मयाचे सखोल अध्ययन केले.

अशा रीतीने बालपणापासूनच बसवेश्वरांचे व्यक्तिमत्त्व संपन्न होत गेले. सभोवतालच्या परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण बसवेशांनी या काळात करून ठेवले. मोठेपणी त्यांनी हाती घेतलेल्या कार्याला बालवयातील या चिंतनाचा आणि निरीक्षणाचा खूप फायदा झाला. बसवेशांच्या शब्दाला वजन आले आणि कृतीने कर्तृत्वाचे रूप घेतले.

■

# ३. शुभ-मंगल-सावधान

दिवस जात होते. कळीचे फूल होत होते. रोपट्याचा वृक्ष होऊ पहात होता. बालपणातून बसवेशांनी तारुण्यात पदार्पण केले. ओठांवर काळी रेघ शोभू लागली. बसवेशांचे मामा बलदेव यांची भाच्यावर बहाल मर्जी होती. बलदेव हे बिज्जल राजाच्या दरबारी होते, मुख्यप्रधान म्हणून. मोठा दरारा आणि वचक होता त्यांच्या कर्तबगारीचा!

कर्तबगार मामाने कर्तृत्ववान भाच्याला हेरले. भाच्यालाच जावई करायचा निश्चय त्यांनी केला. एक दिवस बलदेवांनी आपल्या बहिणीजवळ ही गोष्ट काढली. माहाम्बा त्यावर काय बोलणार! साक्षात लक्ष्मी आपल्या पायांनी चालून आलेली. माहाम्बेने गंगाम्बेला सून करून घेण्याचा निर्णय तत्काल ठरवला. माहिराज तर या भाग्याने अक्षरश: दिपून गेले होते.

बिज्जलाची राजधानी दुमदुमू लागली. मुख्य प्रधानाच्या कन्येचा विवाह! हलकीसलकी बाब नव्हती. जो तो आपल्याच घरचे कार्य समजून तयारीतील आपला वाटा उचलीत होता. 'कल्याण' नगरीत गुढ्यातोरणे झळकू लागली. स्वच्छ सड्याने सारविलेल्या रस्त्यावर रांगोळीची नक्षी झळकू लागली. राजधानीचा थाट दिवसागणिक वाढू लागला.

अखेर तो दिवस उगवला. सनईच्या मंगल सुरांबरोबर सकाळ आली. गंगाम्बा आणि बसवेश्वर यांच्यावर अक्षतांचा पाऊस पडला. सगळी राजधानी वधुवरांना आशीर्वाद देण्यासाठी लोटली होती. माहीराज कृत्यकृत्य झाले. सुनमुख पाहताच माहाम्बेचा ऊर दाटून आला. बलदेवांचे डोळे समाधानाने सुस्तावले होते. साश्रु नयनांनी त्यांनी नवदाम्पत्याला आशीर्वाद दिले.

लग्नानंतर कसेबसे एक महिनाभर बसवेश्वर आपल्या सासऱ्याकडे राहिले. पण संगमेश्वराच्या भेटीची तळमळ दिवसेदिवस वाढत होती. आपली पत्नी गंगाम्बा हिच्यासह बसवेश्वर संगमेश्वरी येऊन राहिले. तेथील प्रसन्न वातावरणाने बसवेश्वर तल्लीन होत. शिवाच्या सान्निध्यात वैवाहिक आयुष्याचा सुरुवातीचा काळ बसवेशांनी मोठ्या आनंदाने घालविला. नव्या आयुष्याची नांदी संगमेश्वराच्या सान्निध्यात बसवेशांनी आपल्या आवडीच्या विषयांवरील सखोल चिंतन केले.

बसवेशांचा जीवनवृत्तांत देताना संगमक्षेत्राविषयी डॉ. भांडारकर लिहितात की, 'संगमक्षेत्र' हे बसवेशांचे प्रिय देवालय होते. (इट्‌ वॉज हिज फेव्हरिट श्राइन) कृष्णा आणि मलप्रभा या दोन नद्यांच्या सुरेख संगमावर कप्पडी नावाचे एक गांव आहे. याच गावी हे संगमेश्वराचे स्थान आहे. दिवसरात्र वाहणारे पाणी, हिरवीगार वनश्री, मोकळे वातावरण आणि मनाला मोहविणारा एकांत अशा अनेक गोष्टींनी संगमक्षेत्राचे कप्पडीचे वैभव नजरेत भरण्यासारखे होते. विवाहासारख्या मंगल व आनंददायक प्रसंगानंतर इतर कोठे न जाता बसवेश संगमक्षेत्री गेले ते यामुळेच होय. याच ठिकाणी त्यांना वीरशैव मतांची पुनर्जागृति करण्यास अनुज्ञा मिळाली असे म्हणतात. एवढे मात्र खरे की बसवेशांच्या अजोड कर्तृत्वाला संगमेश्वराची स्फूर्तीच कारणीभूत झाली.

■

# ४. कल्याणनगरीत बसवेश

संगमेश्वराच्या चिंतनात आणि इतर अनेक विषयांच्या अध्ययनात बराच काळ बसवेशांनी घालविला. हळूहळू ते समाजात येऊ लागले. लोकांची स्थिती अजमावू लागले. कल्याणनगरीत त्यांचे सासरच होते. बलदेवांच्याकडे जाणे-येणे होऊ लागले. यानिमित्ताने कल्याणनगरीत बसवेश्वर अनेक वेळा येऊन गेले. प्रत्येक वेळी ते काहीतरी नवे घेऊन येत आणि नवे घेऊन जात. आपले विचार घेऊन येत; लोकांचे विचार घेऊन जात. हळूहळू बसवेश्वरांची तेजस्वी मूर्ती कल्याणनगरीला चांगलीच परिचित झाली. आणि आता तर त्यांना ती आवडू लागली.

बसवेश्वरांचे कर्तृत्व कल्याण नगरीतील जनतेच्या डोळ्यांत भरले. बिज्जलाची नजर बसवेशांवर खिळून राहिली. बलदेवमामा आता वृद्ध होत चालले होते. पूर्वीसारखी ताकद आता राहिली नव्हती. हातापायाला कंप सुटण्यास सुरुवात झाली होती. भरदार चेहरा सुरकुत्यांनी भरू लागला होता. राज्यकारभाराची धुरा सांभाळण्यासाठी मन कणखर लागते, तसेच शरीरही लागते. पण शरीराचा आधार आता तुटत चालला होता. एक दिवस राजा बिज्जलाने बलदेवांना बोलावणे केले. बिज्जलाच्या महाली बलदेव आले. राजाने आसनावरून उठून बलदेवांचे स्वागत केले. समोरच्या आसनावर बसत बलदेवांनी विचारले.

''महाराज, का बोलवणे केले?''

''प्रधानजी, तुमचा आधार आम्हाला भरपूर, म्हणून आम्ही निश्चिंतपणे हा कारभार करू शकलो. तुमचे सारथ्य आम्हाला लाभले. म्हणूनच हा रथ एवढा वेगाने पुढे धावला. या सगळ्या गडबडीत तुमच्या शरीरस्वास्थ्याची

विचारपूस करणे आम्हालाही झाले नाही. आणि तुम्हीही कधी त्याकडे लक्ष दिले नाही. तुम्ही ठीक आहात ना?'' ''होय महाराज. या घडीला तरी ठीकच आहे. पण आता वय झाले. आयुष्याची दिशा पश्चिमेकडे झुकू लागली आहे. संध्याकाळच्या सावल्या स्पष्ट दिसत आहेत.''

राजा बिज्जलाचा चेहरा चिंतातूर दिसू लागला. बराच वेळ कोणीही बोलले नाही. मग बिज्जलानेच सुरुवात केली.

''प्रधानजी, आपल्या हातून काम ठीक होते ना? नाहीतर आपण विश्रांतीसाठी कुठेतरी जावे चार दिवस.''

''महाराज, आपल्या या जिव्हाळ्याबद्दल मी आपला सदैव ऋणी असेन. अजून तरी हातपाय चालताहेत. तोवर ते चालू द्यावेत. नाही त्या दिवशी मी आपणाकडे येऊन सेवामुक्त करण्याची मागणी करीनच.''

''छे, छे, प्रधानजी, तुम्हाला एकदम सेवामुक्त करणे आम्हास जमणार नाही.''

''मग मी काय करावे म्हणता आपण?'' बलदेवांनी विचारले. ''तुमची गादी चालवू शकेल असा एखादा चलाख असामी हुडकून काढा. प्रधानजींची वस्त्रे त्याला पेलली पाहिजेत. मोठेपणाच्या यातना त्याला सोसता आल्या पाहिजेत.''

''होय महाराज. आपण म्हणता ते खरेच आहे. पण याविषयी आपणाशी मागाहून बोलेन'' – असे बोलून बलदेव राजाच्या महालातून बाहेर पडले.

बलदेवांच्यासमोर आता विचित्र समस्या उभी ठाकली. राजा बिज्जलाची सूचना त्यांना आनंद देत होती. बसवेशांचे तडफदार कर्तृत्व डोळ्यासमोर होते. सुवर्णयोग जमून येणार होता... पण... पण त्यात एक फार मोठी अडचण होती.

स्वत: राजा बिज्जल हा जैनमतानुयायी होता. त्याचा कल जैनधर्माकडे होता. बसवेश्वर हे तर कट्टर शैवमतानुयायी होते. शिवभक्तीच्या प्रसारार्थ बसवेश्वरांनी आतापावेतो भरघोस कार्य केले होते. कर्नाटकात शिवभक्तांची एक चांगली संघटना त्यांनी उभारली होती. शिवमताला पुन्हा एकदा

चांगले स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी बसवेश्वरांनी कंबर कसली होती. शैव आणि जैन यांच्यात चांगलाच विरोध होता. दोन्ही पंथाचे अनुयायी एकमेकांना पाण्यात पहात असत. राजा बिज्जल हा जैनधर्मीय असल्याने साहजिकच शिवपंथाचे लोक त्याच्या विरुद्ध होते. आणि अर्थातच या विरोधाचे पुढारी तरुण आणि कर्तबगार बसवेश्वरच होते. आतापर्यंत हा विरोध विकोपाला गेला नव्हता कारण मामा-भाचे श्वशुरजामात सामोरासामोरे होते. उत्पन्न होणारे वाद नात्याच्या जाणीवेने तिथल्यातिथे विझत असत. पण ही कीर्ति राजा बिज्जलाच्या कानावर गेली होती. आणि म्हणूनच बलदेवांसमोर विचित्र पेच निर्माण झाला होता.

प्रधानपद म्हणजे सुळावरची पोळी असते. तारेवरची कसरत असते. ही कसरत बसवेशांसारख्या तल्लख व कर्तबगार माणसालाच जमेल हे बलदेवांना स्पष्ट दिसत होते. आपण जे भरभराटीला आणले ते टिकवून त्याला अधिक रंगरूप देण्यास आपला जावई समर्थ आहे, हे बलदेवांना कळून चुकले होते. पण... राजा बिज्जलाचा प्रधान म्हणून प्रत्यक्ष विरोधी पक्षाचा पुढारी उभा करणे हे काम फार कठीण होते.

पण हे कठीण कामही पार पाडणे आवश्यक होते. बलदेवांनी आपला निश्चय कायम केला. एवढ्या अवधीत बसवेश्वरांचे कल्याण नगरीतील येणे-जाणे आणखी वाढले होते. राजधानी बसवेशांना चांगली ओळखू लागली होती. कल्याणनगरीत बसवेश्वरांचे नाव या ना त्या निमित्ताने वारंवार घेतले जाऊ लागले. हीच त्यांच्या भावी आयुष्याची नांदी होती, प्रधानपदाची पूर्व तयारी होती. कर्तबगारीचा खरा शुभारंभ होता. जनमनात बसवेश्वरांनी कायमचे स्थान पटकावले होते.

■

# ५. प्रधानपदावर बसवेश्वर

वृद्धापकाळ हीच एक मोठी व्याधी असते. त्यातच भर म्हणून की काय, बसवेश्वरांचे मामा व श्वशुर बलदेव हे एका असाध्य व्याधीने पछाडले. या व्याधीतून आता आपण वाचणार नाही, हे काळकुट्ट भविष्य बलदेवांना स्पष्ट दिसू लागले होते. स्वत:च्या जीवाची त्यांना फारशी पर्वा नव्हती. पिकले पान केव्हातरी गळून पडणारच होते. पण राज्यकारभाराचा रथ सुरळीतपणे नेणारा सारथी हवा होता. शैव आणि जैन यांच्यातील कलह विकोपाला जाऊ न देणारा मुत्सद्दी प्रधान हवा होता.

बलदेवांनी अनंत विचार केला. पण बसवेश्वरांशिवाय कोणतीच मूर्ती त्यांच्या डोळ्यापुढे येईना. एक दिवस वृद्ध बलदेवांनी राजा बिज्जलाची खास भेट घेतली. बलदेवांना पाहताच राजाने उठून अभिवादन केले. यावे यावे प्रधानजी, तब्बेत ठीक आहे ना?'' ''आता ठीक असली काय अन् नसली काय सारे सारखेच. पण महाराज मागे एकदा आपले बोलणे झाले होते. त्याविषयी मी निर्णय घेऊन आलो आहे. ''बोला प्रधानजी. आपले शब्द आम्हाला मंजूर आहेत.'' ''महाराज, माझी सद्दी संपली. मी आता आकाशाकडे डोळे लावून बसलो आहे. बोलावणे आले की जायचे एवढेच आता उरले आहे. माझ्या पश्चात्...''

''बोला प्रधानजी, अडखळलात कसे?''

''माझ्या पश्चात्, माझ्या जामातांना- बसवेश्वरांना प्रधानपदाची वस्त्रे देऊ करावीत असे सुचवायला मी आलो होतो.''

क्षणभर राजा बिज्जल गोंधळला. एकच क्षण त्याचा धर्माभिमान उसळून आला. पण दुसऱ्याच क्षणी बसवेश्वरांची कर्तबगारी व तडफ त्याच्या डोळ्यांसमोर साकार झाली. बसवेश्वरांच्या तेजापुढे राजा

बिज्जलाचा धर्माभिमान निस्तेज झाला आणि बिज्जलाने तात्काळ संमती देऊन टाकली. राजा म्हणाला- "प्रधानजी, मंजूर आहे आम्हाला तुमची योजना" बलदेवांचे डोळे आनंदाने भरभरून आले. त्यांना आनंद झाला होता तो आपला जावई प्रधान झाल्याचा नव्हे, तर आपल्या पश्चात् आपल्याहून कर्तबगार माणूस प्रधानपदावर येणार याचा.

तीन माणसे तीन तऱ्हांनी विचार करीत होती. बसवेशांना प्रधानपदाची वस्त्रे देऊन आपण आपल्या राजाचे आणि राज्याचे कल्याण साधणार आहोत असे बलदेवांना वाटत होते तर बलदेवांसारख्या कर्तबगार प्रधानाच्या पश्चात् त्यांनीच सुचविलेला माणूस इष्ट होय असे राजा बिज्जलाला वाटत होते. त्यामुळे राजाने काहीही आढेवेढे न घेता बलदेवांच्या सूचनेला संमती देऊन टाकली. पण बसवेशांचा हेतू प्रधानपदाची जबाबदारी स्वीकारण्यात वेगळाच होता. प्रधानकी म्हणजे सत्तेची जागा. प्रत्यक्ष उच्च अधिकार हातात आल्यावर आपल्या नव्या पंथाविषयी अनुकूल कामगिरी आपल्याला चांगल्या तऱ्हेने करता येईल हे बसवेश्वरांना मनोमन पटले. राजदरबारात आपले वजन वाढले; म्हणजे आपोआपच आपल्या पंथाचेही वजन वाढेल या विचाराने बसवेशांनी प्रधानपदाची जबाबदारी अंगावर घेण्याचे कबूल केले.

राजदरबारात बसवेश्वरांविषयीचे कुतूहल कलेकलेने वाढत गेले. राजा बिज्जलाच्या दरबारात बलदेवानंतर एकेक अतिरथी महारथी पुष्कळ होते. पण त्यांची वर्णी न लागता प्रधानाच्या जावयाचीच वर्णी लागली. द्वेष, मत्सर, कुतूहल, कौतुक, आश्चर्य या भावना दरबारात भरभरून वाहू लागल्या. पण हा प्रवाह अधिक फोफावला नाही. बसवेश्वरांचे तेजस्वी कर्तृत्व सर्वांना दिपवून टाकीत होते. त्यामुळे जो तो आपापल्या मनाशी विचार करून स्वस्थ बसला.

बलदेवांची प्रकृती हळूहळू खचत चालली होती. ढासळल्या बुरुजाप्रमाणे त्यांचा वज्रदेह होत चालला होता. तरीही राज्यकारभाराची सूत्रे सांभाळण्याचे काम ते करीतच होते. पण खिळखिळा जीव किती दिवस तग धरणार! एक दिवस अती झाले. जीव घाबरा झाला. सगळे सगेसोयरे जमले. गंगाम्बा आली. महिराज व माहाम्बा आली. शरपंजरी

पडलेल्या बलदेवांनी माहाम्बेला बोलावले.

"माहाम्बे, तुझा पुत्र मोठा गुणी. शिवाचे वरदान आहे त्याला. त्याची तडफ मोठी. माझी मुलगी तर मी त्याला दिलीच. पण आता माझे सर्वस्व मी त्याला देणार आहे." बसवेश्वर शेजारीच होते." नका हो बोलू फार. त्रास होईल आपणाला" बसवेश्वर कळवळ्याने म्हणाले, "बोलू दे. आता शेवटचेच बोल हे. पुन्हा कशाला तोंड उघडणार आहे आता. माझी... माझी सारी जबाबदारी मी तुझ्यावर... तुमच्यावर सोपवली आहे. पाडाल ना पार ती? बलदेवांच्या घशांत घुरघुर होऊ लागली. गंगेचे पाणी त्यांच्या मुखात घालण्यात आले. "हो, आपली सर्व जबाबदारी मी पार पाडीन." बलदेवांनी बसवेशाचा हात हातात घेतला. आणि... आणि... दिवा विझला, गंगाम्बेने हंबरडा फोडला. माहिराजांचे डोळे भरभरून वाहात होते. माहाम्बा ऊर भरून मुग्ध होती... बलदेवांच्या पार्थिव देहाचा हात बसवेशांच्या हातात होता. बलदेवांच्या निर्जीव मुखावरती त्यावेळी अतीव समाधान दिसत होते. सारा राजवाडा शोकाने भरून गेला. कल्याणनगरीवर स्मशानाचे सावट पडले होते जणू.

हळूहळू शोक विसरला. कारभाराचा गाडा पुढे रेटणे आवश्यक होते. आणि मग एके दिवशी कल्याण नगरीत गुढ्या तोरणे उभारली गेली. राजाचा दरबार मानकऱ्यांनी फुलून गेला. सनईचे मंगल सूर वातावरणात दरवळत होते. नोकरचाकरांची धांदल चालू होती. ललकाऱ्या झाल्या. पुन्हा सर्वत्र शांतता पसरली. "राजाधिराज बिज्जल आसनस्थ झाले. सर्व दरबारी आणि मानकरी यांनी आपापल्या जागा घेतल्या. मुहूर्ताची घटिका जवळ येत चालली होती. 'घटिकापात्र भरले आणि राजा बिज्जलाने प्रधानपदाची वस्त्रे बसवेश्वरांना बहाल केली. टाळ्यांचा कडकडाट झाला. वाद्यांचा गजर घुमला. माहाम्बेचा पान्हा डोळ्यावाटे वाहू लागला. वृद्ध माहीराजांचा कंठ दाटून आला. नव्या प्रधानावर साऱ्यांच्या कौतुकमय नजरा खिळल्या. बसवेश्वरांनी राजाला आणि प्रजेला अत्यंत नम्रपणे अभिवादन केले. जयजयकाराचा घोष अंतराळात दुमदुमला–

"मुख्य प्रधान बसवेश्वर की जय."

■

# ६. राजा बिज्जल आणि बसवेश्वर

प्रधानपदाची जोखीम स्वीकारण्यापूर्वीच बसवेश्वरांनी आपल्या पंथाची प्रगती होण्याच्या दृष्टीने सर्व पूर्वतयारी करून ठेवली होती. बसवेश्वरांचा भाचा चन्नबसव हा बसवेशांपेक्षाही अधिक तडफदार होता. पण बसवेशांइतकी अनुभवाची पुंजी त्याच्याजवळ नव्हती. अर्थातच राज्यकारभाराची जबाबदारी अंगावर घेतल्यावर शैवपंथाचे सर्व कार्य चन्नबसवाच्या नेतृत्वाखालीच चालू लागले. बसवेश्वर फक्त मार्गदर्शन करीत.

राजा बिज्जल व त्याचे इतर दरबारी लोक हे जैनपंथीय होते. ही अडचण ओळखूनच बसवेश्वरांनी राजाशी आधीच बोलणे केले.

‘‘महाराज, मी आहे कडवा शिवभक्त, माझ्याकडे देशोदेशीचे शिवभक्त येणार. मी त्यांची सरबराई करणार. ही गोष्ट कोणाच्या डोळ्यात सलेल व कुणी माझा मत्सरही करू लागेल. शिवभक्तांचा अपमान झाल्यास मी राज्यत्याग करून निघून जाईन.’’

‘‘मंजूर आहे आम्हांला. आम्ही तुमच्या कोणत्याही कार्यक्रमात विनाकारण हस्तक्षेप होऊ देणार नाही.’’ बिज्जलाकडून हे अभिवचन मिळविल्यावरच बसवेश्वरांनी प्रधानपद स्वीकारले होते. या स्पष्टवक्तेपणामुळे विरोधी पंथ असूनही बसवेश्वर आणि राजा बिज्जल यांचे संबंध स्नेहाचे राहिले.

हळूहळू हे स्नेहाचे संबंध अधिक जिव्हाळ्याचे झाले. बसवेशांच्या संमतीने राज्यातील सर्व सूत्रे हलू लागली. राजा बिज्जल आणि बसवेश्वर आता राजा आणि मंत्री राहिले नव्हते. ते आता जिवाभावाचे मित्र बनले होते. एकमेकांच्या घरी एकमेकांचे येणे जाणे होऊ लागले. एका घरची

मंडळी वारंवार दुसऱ्या घरी जाऊ लागली. जिव्हाळ्याची बोलणी बोलता बोलता कधी कधी तत्त्वज्ञान व धर्म यांवरही बसवेश्वरांची आणि राजाची चर्चा होत असे. या चर्चेच्या ओघात बसवेश्वरांनी राजा बिज्जलाला शिवभक्तीचा महिमा ऐकविला. जेणेकरून आपली प्रखर शिवभक्ति प्रकट होईल आणि राजाचे मत अनुकूल होईल अशी एकही संधी बसवेश्वरांनी सोडली नाही. हाती असलेली सत्ता, दरबारातील वजन आणि राजाशी असलेले निकटचे संबंध यांचा पुरेपुर उपयोग बसवेश्वरांनी करून घेतला. अर्थातच चांगल्या रीतीने. पण याचा परिणाम काही बाबतीत अगदी उलटा झाला. बसवेश्वरांच्या यशामुळे दिपून जाणाऱ्या लोकांच्या मनात मत्सर मूळ धरू लागला. हे मत्सराचे पीक हळूहळू फारच फोफावले. निकटचे दरबारी लोक बसवेश्वरांना पाण्यात पाहू लागले. त्यांना उलट बोलता येत नव्हते. कारण ते शक्यच नव्हते.

कल्याण नगरीसारख्या राजधानीच्या शहरीही शिवभक्तांचे प्राबल्य वाढू लागले. चन्नबसवाचे नेतृत्व होते, बसवेश्वरांचा कणखर आधार होता. या आधारावर शैवपंथ कल्याणनगरीत चांगलेच बाळसे धरू लागला होता. पण याचा परिणाम उलटा झाला. आपला राजा असूनही आपल्याला हवे तसे दरबाराकडून सहाय्य मिळत नाही ही जैनपंथीयांची कल्पना पक्की झाली. राजा बिज्जल पूर्णपणे बसवेशांच्या आधीन झाला आहे असे त्यांना वाटले. यावर उपाय म्हणजे बिज्जलाचे मन बसवेशांविषयी या ना त्या प्रकारे कलुषित करणे. अर्थातच या दिशेने जारीने प्रयत्न सुरू झाले. बसवेश्वर आणि बिज्जल यांच्या संबंधात विष कालविण्यासाठी दरबारी लोकांनी कंबरा कसल्या. विषाची शोधाशोध सुरू झाली. कलहासाठी संशोधन सुरू झाले.

आणि मग लोक म्हणू लागले, ''उगीच नाही बिज्जलांचे आणि बसवेशांचे संबंध इतके जवळचे. अहो, त्यालाही कारण आहे. बसवेश्वरांना एक बहीण होती. पद्मावती तिचं नाव. पद्मावती सुंदर होती. निळे निळे डोळे, काळे काळे केस, गोरे गोरे हात, कुंदकळ्यांचे दात; पद्मावती म्हणजे

साक्षात सौंदर्य होते. या सौंदर्यावर राजा बिज्जल मोहित झाला आणि म्हणून त्याने बसवेश्वरांची मैत्री वाढविली असे काही लोक म्हणू लागले.

या उलट काही लोक असेही म्हणू लागले की बसवेश्वरांचा विवाह राजाची भगिनी नीललोचना हिजबरोबर व्हावयाचा असावा. राजाच्या मनात बसवेश्वरांची कर्तबगारी भरली होती. अशा तडफदार आणि कर्तृत्ववान माणसालाच आपली बहीण द्यावी असे राजा बिज्जलाला वाटत होते. आणि म्हणून राजा बिज्जल बसवेश्वरांशी इतक्या सलगीने वागत होता. नानातऱ्हांचे नाना लोक. त्यांचे नाना विचार. पण या सगळ्या विचारमंथनांतून अमृत न निघता बसवेशांच्या मत्सराचे विषच निघू लागले. हा मत्सराग्नि हळूहळू रौद्रस्वरूप धारण करू लागला.

पण साऱ्या चक्रव्यूहात बसवेश्वर मुळीच सापडले नाहीत. उलट आपल्या धीमेपणाने त्यांनी ही सारी आग वारंवार विझविण्याचाच प्रयत्न केला. शांतपणा बसवेश्वरांच्या रक्तात मुरला होता. कावळ्यांनी आकाशात कितीही कावकाव केली तरी धीरगंभीर पावले टाकणाऱ्या वनराजाचे लक्ष त्याकडे थोडेच जाणार? वनराजाचा पराक्रम कावळ्यासाठी नसतो. दुसरी बाजू तितकीच खंबीर असावी लागते. त्यामुळे बसवेश्वरांच्या चारित्र्याविषयी लोकांनी कितीही काळेंबेरे कोरडे ओढले तरी बसवेश्वर शांत होते. अगदी संगमेश्वराच्या मूर्तीसारखे. सांबाच्या पिंडीसारखे. राजा बिज्जलाचे आणि आपले संबंध त्यांनी कधीही बिघडू दिले नाहीत.

■

# ७. ठिणगी भडकली

आपल्यावरील सर्व आरोप बसवेश्वरांनी शांतपणे गिळून टाकले. पण माणूस आहे. गिळून गिळून किती गिळणार! सोसून सोसून किती सोसणार! शिवाय आता दुसऱ्या बाजूला विरोध अधिकाधिक धुमसत चालला होता. बसवेश्वरांची शिवभक्तीही लोकांच्या डोळ्यावर आली. संगमेश्वरांच्या आशीर्वादाने वीरशैवपंथ फोफावत चालला होता. सारा कर्नाटक आणि आंध्र वीरशैवमय होऊ लागला होता.

बसवेश्वरांनी शिवभक्तांना केलेली मदत ही गोष्ट अगदी उघडपणे सलणारी होती. शिवभक्तांना सढळ हाताने मदत करण्यात बसवेश्वरांनी जरादेखील कसूर केली नाही. निरनिराळ्या उत्सवांना मदत देणे, शिवभक्तांना आसरा देणे, आणि येन केन प्रकारेण शैव पंथ वाढीस लावणे यासाठी बसवेश्वर अहोरात्र झटत होते. राजा बिज्जलाच्या मंत्रीमंडळात बसवेश्वरांचा एक कट्टर विरोधक होता. मंथन त्याचे नाव. बसवेश्वरांची कीर्ति आणि कर्तृत्व वाढत जाईल तसतसा मंथनाचा जळफळाट आणि तळतळाट वाढतच गेला. पण आग नुसती धुमसत होती. कुठेतरी ठिणगी आवश्यक होती. तिच्याच शोधात मंथन होता. शिवकार्याला बसवेश्वरांची होत असलेली उदार मदत मंथनाला तप्त करीत होती. तो स्वत: कट्टर जैन होता. त्याला ठिणगी सापडली. त्याने फुंकर मारली. बसवेश्वरांवर अफरातफरीचे आरोप करण्यात आले. तिजोरी बसवेश्वरांचे ताब्यात होती. स्वभाव उदार होता. विरोधाचा वडवानल धुमसत होता. याचा उपयोग मंथनासारख्या शत्रूने करायचा नाहीतर कुणी. एक दिवस मंत्रीमहाशय मंथन राजा बिज्जलाकडे गेले.

"महाराज, काही गोष्टी उघड बोलायच्या आहेत. अभय मिळावे."

"अभय असो. बोला मंथन, काय सांगणार आहात?"

"महाराज अलीकडे सगळा कारभार आपले प्रधानजीच बघतात."

"बरे मग?"

"तिजोरी त्यांच्याच हाती असते."

"हो खरे आहे."

"मला काही चिन्ह ठीक दिसत नाही."

"कुणाचे? कशाचे?"

"बसवेश्वरांचे आणि त्यांच्या ताब्यात असलेल्या आपल्या खजिन्याचेही."

"समजलो आम्ही मंथन, समजलो आम्ही. जा तुम्ही आता" मंथन काडी लावून निघून गेला. पण इतक्या लवकर पेटणारे हे लाकूड नव्हते. ते स्नेहार्द्र होते. राजा बिज्जलाने बराच वेळ विचार केला. प्रथम प्रथम त्याने दुर्लक्षच केले. पण वारंवार तीच तीच गोष्ट राजाच्या कानावर घातली जाऊ लागली. मंथनाची सारी किमया. कधी तो स्वत: सांगे; कधी दुसऱ्यांकडून सांगावयास लावी. चहाड्या, चुगल्या, तक्रारी यांना नुसता ऊत आला. बसवेश्वरांविरुद्ध रान पेटण्याची जय्यत तयारी झाली होती. फक्त राजा बिज्जलाने मनावर घ्यायचा अवकाश की आग पेटणार होती.

हळूहळू राजा बिज्जलाचा बसवेश्वरांवरील विश्वास उडू लागला. बसवेशांच्या प्रत्येक कृत्याकडे तो साशंकतेने पाहू लागला. बसवेश्वरांचे प्रत्येक पाऊल त्याला संशयास्पद वाटू लागले. प्रेम संपले. स्नेह लोपला. अर्थातच अशावेळी मूळ विरोधाचा मुद्दा म्हणजे धर्म; दोघांचे दोन मार्ग होते. दोघांचे दोन भिन्न विचार होते. ओढाताण सुरू झाली. धुमसणारी आग पेट घेऊ लागली. राजा बिज्जलाच्या सहिष्णु धोरणांत बदल झाला. बसवेश्वर आणि बिज्जल यांच्यात पूर्वी कधीही उत्पन्न न झालेली धार्मिक तेढ अंकुरली आणि काही दिवसांत ती चांगलीच वाढीस लागली.

राजा आणि मंत्री यांचे आता पटेनासे झाले. सगळीकडे राजकीय

बेबनावाचे वातावरण धुमसू पहात होते. बसवेश्वरांवरील अफरातफरीचे आरोप दिवसेंदिवस अधिकाधिक राजमान्यता मिळवत होते. हेच आरोप पुन:पुन: चारी दिशांनी कानावर येऊ लागले. एक दिवस अती झाले. राजा बेचैन झाला. राजाचे मस्तक सणाणून तापले. राजाने तत्काल हुकूम सोडला. ''बसवेश्वरांना पकडून आणा; कैद करा.''

राजाचे शिपाई बसवेश्वरांना पकडण्यासाठी म्हणून त्यांच्या निवासस्थानी गेले. पण बसवेश्वर होतेच कुठे! सारे नगर धुंडाळले. सगळा दरबार पालथा घातला; तरी प्रधानाचा पत्ता लागला नाही. मंत्री हताश झाले. राजा चिडला. बसवेश्वरांना पकडण्यासाठी राजाने आपले सैनिक पाठविले. घोडेस्वार धावले, शस्त्र परजली. पण काही उपयोग झाला नाही. बसवेश्वरांनी या सैनिकांच्या हातावर तुरी दिली. हात हलवीत परत आलेले सैनिक पाहून राजाही संतापला. त्याला आवेश चढला. वाटेल ते करून बसवेश्वरांना पकडलेच पाहिजे असा त्याने चंग बांधला.

एवढा वेळ पावेतो बसवेश्वरांचे सारे अनुयायी त्यांचेभोवती गोळा झाले होते. बिज्जल आणि बसवेश्वर यांचा बेबनाव आता अगदी जगजाहीर झाला होता. ठिकठिकाणचे प्रखर शिवभक्त बसवेश्वरांना येऊन मिळत होते. बसवेश्वरांची बाजूही आता चांगलीच खंबीर झाली होती. राजा बिज्जल साऱ्या तयारीनिशी बसवेश्वरांना पकडण्यासाठी त्यांचेवर चालून आला. राजाच्या पाठीमागे प्रचंड शस्त्रबळ, सैन्य, पैसा सारे सारे होते. पण काय किमया झाली कोणास ठाऊक. याही वेळला बसवेश्वरच यशस्वी झाले. राजा बिज्जलाचा पुरता पराभव झाला. पराभूत बिज्जल राजा शेवटी बसवेशांना शरण गेला. त्याशिवाय त्याला गत्यंतरच उरले नव्हते.

शरणागत राजाला बसवेश्वरांनी लगेच मुक्त केले. आणि सर्वजण पुन्हा होते तसे कल्याणनगरीत येऊन दाखल झाले. बसवेश्वर आपल्या प्रधानपदावर पुन्हा काम पाहू लागले. पण अर्थातच आता दोघांचीही मने पूर्वीसारखी साफ नव्हती. एकमेकांचा विश्वास एकमेकांवर नव्हता. कुणाचा विश्वास कुणाला नव्हता. करायचेयच म्हणून काम चालले

होते. लढाईने मेलेली आग पुन्हा जिवंत होऊ पहात होती. कारवाई करूनसुद्धा बसवेश्वरांचा रुबाब कायम राहतो आहे ही गोष्ट बिज्जलाच्या सर्व मंत्र्यांना, दरबारी लोकांना राहून राहून खटकत होती. पण राजाच्या शरणागतीने सर्वांची तोंडे कुलुपबंद झाली होती. उघड उघड कोणी बोलत नव्हते. आतून मात्र सारे शिजत होते. विझलेले पुन्हा धुमसत होते. बसवेश्वर हे मुरब्बी राजकारणी होते. या सर्वांशी सामना देत ते अजून होते तसे टिकून होते. विरोधाची आग त्यांना भाजू शकली नाही.

■

# ८. नको ती राजधानी

आता तर अवध्या राजधानीत अक्षरश: बेबंदशाही माजण्याची पाळी आली होती. एका बाजूला कट्टर जैनपंथीय सत्ताधीश तर दुसऱ्या बाजूला शिवभक्त असा सरळ सरळ सामना सुरू झाला. रस्सीखेच रंगत आली. 'शेंडी तुटो वा पारंबी तुटो' अशी वृत्ती दोन्ही पंथांत बोकाळली. बसवेश्वर हे स्वत: समतेचे पुरस्कर्ते होते. जातिभेद त्यांना मान्य नव्हता. मिश्रविवाहाला ते नेहमीच प्रोत्साहन देत होते. कर्मठ धर्ममार्तंडांना ही गोष्ट पसंत नव्हती.

एवढ्यात कल्याणनगरीत एक अभूतपूर्व घटना घडून आली. हरळय्या नावाचा एक तरुण राजधानीत होता. त्याचा विवाह मधुवरसा नावाच्या एका मुलीशी व्हावयाचा होता. मधुबरसेचे वडील राजदरबारी बडे मंत्री होते. जातीनेही ब्राह्मण. त्यामुळेच मोठा पेचप्रसंग निर्माण झाला होता. कारण हरळय्या होता अस्पृश्य. हा अस्पृश्य-ब्राह्मण विवाह म्हणजे कल्याण नगरीतील एक खळबळजनक घटना होती. संवादी विसंवादी सूर कल्याणनगरीत खळाळत होते. वातावरण तप्त होते. शेवटी हे प्रकरण निर्णयासाठी बसवेश्वरांपर्यंत आले. एकीकडे जैनपंथीय राजाचे प्रधानपद आणि दुसरीकडे समतावादी शैव भूमिका या दोन विचारांच्या कात्रीत बसवेश्वर सापडले. कोणताही निर्णय घेण्याचे वेळी स्वत्व सोडावयाचे नाही हा बसवेश्वरांचा बाणा. त्याला अनुसरूनच बसवेश्वरांनी हरळय्या व मधुवरसा यांच्या विवाहाला आपली संपूर्ण संमती दिली. थाटामाटात लग्न लागले. बसवेश्वरांनी मुक्तकंठाने आशीर्वाद दिले. मधुवरसेने हरळय्याच्या घराच्या उंबरठ्याचे माप ओलांडले. गृहलक्ष्मी प्रवेश करीत होती. एवढ्यात राजा बिज्जलाचे शस्त्रधारी सैनिक पिसाटासारखे धावून

आले. नवीनच लग्न झालेल्या या जोडप्याला त्यांनी पकडले. दोरखंडांनी गच्च बांधून टाकले. रस्त्यांतून धिंड निघाली. राजवाड्यापर्यंत धिंड येऊन पोचली. संतापाने लाल झालेल्या बिज्जलाने पहाडी आवाजात एक क्रूर हुकूम मोडला. "या धर्मभ्रष्टांचे डोळे काढा."

आणि पडत्या फळाची आज्ञा शिरसावंद्य मानली गेली. नवपरिणित वधुवरांचे डोळे काढण्यात आले. त्यांना नवी दृष्टी देण्याऐवजी त्यांची दृष्टी काढून घेण्यात आली. जिवंतपणी नरकवास त्या दांपत्याच्या कपाळी आला. पण करतात काय बिचारे. एक भयंकर वेड्या धर्मनिष्ठेचे ते बळी होते.

अंगावरची हळद अजून पुसली गेली नाही. तोच मधुवरसेला आंधळे करण्यात आले; संसाराची गोड स्वप्ने पहात बसणाऱ्या हरळय्याचे डोळे काढण्यात आले. या बातमीने संबंध राजधानीत भूकंपाची अवस्था निर्माण झाली. सगळे शिवभक्त अतोनात खवळले. ते बेभान झाले. स्वत: बसवेश्वरांना राजाची ही मुडदेफराशी मुळीच आवडली नाही. अन्यायाचा प्रतिकार प्रभावीपणे करावयाचा हे तर बसवेश्वरांचे ब्रीद. बसवेश्वरांनी आपला एक अनुयायी जगदेव याला या सर्व प्रकरणी लक्ष घालण्यास सुनावले.

जगदेवाने आपले दोन सहकारी मल्लय्या व बोमय्या यांच्यासमवेत राजवाड्यात गोंधळ घातला. प्राणहानी झाली. वित्तहानी झाली. राजवाड्यातील गोंधळाचा प्रतिध्वनी सबंध कल्याणनगरीत उमटला. कल्याणनगरीतील उभयपक्ष एकमेकांवर दातओठ खाऊ लागले. प्रकरण पेटत चालले. ठिणगीचा वडवानल पेटला होता. या वणव्याला आता आवरते घालणे कठीण होते. आपलेच अनुयायी आपल्या ताब्यात राहिले नाहीत हे बसवेश्वरांनी ओळखले. जिकडे तिकडे हाहा:कार माजला होता. त्यामुळे 'थांबा' म्हणूनही कोणी थांबले नसते. भावना भडकली होती, जंगमांवर जैन फुत्कारे सोडीत होते. जैनांवर जंगम दातओठ खात होते. साऱ्या कल्याणनगरीलाच जणू खून चढला होता.

एवढ्या अवधीत बिज्जलाची आयुष्याची दोरी तुटली. बिज्जलाचा

वध करविला गेला असा एक प्रवाद आहे. पुराणात अशी माहिती मिळते की जगदेवाने आपल्या साथीदारांसह राजवाड्यात जाऊन जो कोलाहल माजवला त्यात बिज्जलाचा वध झाला. जैन ग्रंथांवरून मिळणारी माहिती आणखी वेगळी आहे.

शीलाहार भोज याच्यावर स्वारी करण्यासाठी राजा बिज्जल कोल्हापुरावर चालून गेला होता. परतीच्या वाटेवर भीमेच्या तीरी राजाचा तळ पडला. एका शिवभक्त जंगमाने जैन साधूचा वेष घेऊन एक विषारी फळ राजाला दिले. जैनांबद्दल राजाच्या मनात शंका येणे शक्य नव्हते. त्याने त्या फळाचा स्वीकार केला. पण फळाचा वास घेताच तो बेशुद्ध झाला. राजा बिज्जलाचा पुत्र इम्मदिबिज्जल तेथे आला. राजा थोडा वेळ शुद्धीवर आला, त्याने आपल्या मुलाला सांगितलं की हे विषारी फळाचे कृत्य बसवेश्वरांचेच आहे. इम्मदिबिज्जलाने बसवेश्वरांचा सूड घेण्याचे ठरविले. एवढ्यांत विषारी वायूमुळे परिणाम होऊन राजा बिज्जल मरण पावला.

अशा रीतीने राजा बिज्जलाच्या मृत्यूविषयी दोनतीन प्रवाद सापडतात. या सर्व प्रकाराला बसवेश्वर आता कंटाळले होते. या सर्व कोलाहलात आपण परमेश्वरापासून फार दूर दूर जात चाललो आहोत असे बसवेश्वरांना जाणवले. राजधानी तर रणांगण होऊ पहात होती. धर्माच्या नावावर अधर्म चालू होता. या साऱ्या चक्रव्यूहांतून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ते ठिकाण सोडणे. नको ती राजधानी! नको ती कल्याणनगरी! शेवटी एक दिवस अंतिम निश्चय करून बसवेश्वरांनी कल्याणनगरी सोडली. आपल्या कर्मभूमीचा जाणूनबुजून त्याग केला. आणि आपल्या काही अनुयायांसह ते कप्पडीसंगमक्षेत्री येऊन राहिले.

संगमक्षेत्री आल्यावर बसवेश्वरांना जरा हायसे वाटले. कितीक दिवस न लाभलेली शांतता त्यांना त्या ठिकाणी मिळाली. शिवाय आपल्या परमदेवतांच्या संगमेशांच्या सान्निध्यात असल्यामुळे त्यांना मनापासून आनंद झाला आणि ते चिंतनात निमग्न राहू लागले.

■

# ९. ज्योत मालवली

राजधानी सोडल्यानंतर बसवेश्वरांना पुष्कळसे मन:स्वास्थ्य संगमक्षेत्री लाभू लागले. तरीपण शैव आणि जैन यांचा प्रांतभर चाललेला झगडा त्यांना पूर्णपणे अलिप्त ठेवू शकत नव्हता. या झगड्यामुळे बसवेश्वरांच्या शांतताप्रिय मनाचा दाह होत होता.

राजा बिज्जलाच्या मृत्यूनंतर तर जैनपंथीयांना भलतेच अवसान चढले होते. राजाचा मुलगा इम्मदीबिज्जल याने आपल्या सशस्त्र सैनिकांना आज्ञा केली होती की दिसेल तो जंगम कापून काढा. औषधालाही शैव माणूस ठेवायचा नाही अशा उद्देशानेच जणू, शस्त्रधारी सैनिक आपली क्रूर शस्त्रे परजीत, पाजळीत मार्ग आक्रमीत होते. कोणाचीच कोणाला शुद्ध नव्हती. माणूस भावनेत स्वत:लाही विसरतो तसे झाले होते. हाणामारी, रक्तपात, हाहा:कार, अन्याय, सूड या सर्व संमिश्रतेने वातावरण भरून गेले होते. कप्पडी संगमक्षेत्री रोज या ना त्या वार्ता येत असत. आणि बसवेशांचे अंत:करण भरून येत असे.

येथपावेतो संगमक्षेत्री बसवेशांचेजवळ त्यांचा म्हणण्यासारखा एकही अनुयायी नव्हता. त्यांचे सर्व अनुयायी इतरत्र लढत होते. आता बिज्जलाच्या अनुयायांनी आपली दृष्टि चन्नबसव आणि बसवेश्वर यांचेकडे वळवली. राजधानी सोडून बसवेश्वर कप्पडी संगमक्षेत्री जाऊन राहिले आहेत हे सर्वांना ठाऊक होते. अर्थातच बिज्जलाच्या अनुयायांचा मोर्चा कप्पडी संगमक्षेत्राकडे वळला. संरक्षणार्थ माणूस नाही. शस्त्र नाही. भावना चेतलेली, बिज्जलाचे लोक चालून आलेले, अशा भयंकर अवस्थेत बसवेश्वर सापडले होते. पण यांतूनही त्यांना मार्ग काढला.

आपले अवतारकार्य आता संपलेले आहे याची जाणीव बसवेशांना होऊन चुकली होती. मोठ्या माणसांचे जीवन ज्योतीसारखे असते. प्रकाश आहे तोवर ज्योत आहे. प्रकाश संपला, ज्योत विझली असेच बसवेश्वरांचे बाबतीत झाले होते. ज्यासाठी बसवेशांचा जन्म झाला होता ते शैवपंथाच्या पुनरुत्थानाचे कार्य झालेले होते. शिवभक्तीचे मावळलेले महात्म्य पुन्हा उजळले होते. अंकुराचा वृक्ष फोफावला होता. आता माळ्याने जगून तरी उपयोग काय! हाच विचार बसवेश्वरांनी केला. शिवाय कौटुंबिक दृष्ट्याही ते येथपावेतो रिकामे झाले होते. आई-वडील केव्हाच स्वर्गवासी झाले होते. होती फक्त पत्नी गंगाम्बा, पण आता संसार संपला होता. राजकीय जीवनातही कर्तृत्वाच्या शिखरावर बसवेश्वर जाऊन पोचले होते. यशाचे गौरीशंकर ते जिंकून आले होते. मनगोळी येथील पंचायतीत प्रथमत: त्यांनी कामाला सुरुवात केली. आणि वर जाता जाता ते बिज्जलाचे मुख्य प्रधान बनले. यश:श्रीने त्यांना वरले होते. आयुष्यातली सर्व कर्तव्ये पार पाडली होती. कोणतीही आशा मागे उरली नव्हती. कोणताही पाश मागे खेचीत नव्हता. संगमेश्वराच्या आदेशाप्रमाणे आणि आज्ञेनुसार सारे काही सुरळीत झाले होते.

मग आताच्या अंदाधुंदीत आपले जीवन निष्कारण का दवडायचे असा विचार बसवेश्वरांना सारखा टोचू लागला. एवढ्या अवधीत बातमी आली की बिज्जलाचे अनुयायी संगमक्षेत्री येत आहेत. बसवेश्वरांना स्वत:च्या जीवाची पर्वा नव्हती. पण इतक्या मोठ्या शत्रुसैन्याच्या हाती आपण एकटे सापडणार तेव्हा सुटका होणे कठिण. शस्त्रधाऱ्यांच्या निर्जीव शस्त्रांना बळी पडण्यापेक्षा आपण परमेश्वरचरणी रुजू व्हावे असा अंतिम विचार बसवेश्वरांनी केला. अत्यंत भक्तियुक्त मनाने बसवेश्वरांनी संगमेशाचे दर्शन घेतले. सभोवतालच्या सृष्टीकडे एकवार पाहिले. ईश्वरीय चमत्काराचा साक्षात्कार पुन्हा एकदा डोळे भरून पाहिला आणि आपले शरीर शेजारच्या विहिरीत लोटून दिले. संगमेश्वराच्या सान्निध्यात बसवेश्वरांनी प्राणत्याग केला. क्षणार्धात ते संगमेश्वरस्वरूप झाले. मोठ्या ज्योतित लहान ज्योत मिसळून गेली. लहान ज्योत विझली. तिनं आपण होऊन आपले अस्तित्व नाहीसे करून टाकले होते. मोठे होण्यासाठी. ■

# १०. बसवेश्वरांची शिकवण

अवकार कार्य संपल्यावर बसवेश्वर आपणहून संगमेशात विलीन झाले. तरी त्यांच्या शिकवणुकीने ते अमर झाले आहेत. फूल झाडावरून पडले तरी त्याचा सुगंध कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. दिवस आले आणि गेले. बसवेश्वरापासून जगतात अनेक उलथापालथी झाल्या. अणुयुग सुरू झाले. सारे काही बदलले. पण शेवटी माणूस हा माणूसच राहणार ना! ह्या माणसाला 'माणूस' म्हणूनच जगविण्यासाठी बसवेश्वरांनी आपल्या अमोल तत्त्वज्ञानाची देणगी देऊन ठेवली आहे.

बसवेश्वर हे नुसते शिवभक्त नव्हते; नुसते राजकारणी नव्हते; अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते त्यांचे. लढाईच्या वेळी तरवार हातात घेतील तर दरबारात राजनीतीवरील आपलं प्रभुत्व दाखवतील. एखाद्या तत्त्ववेत्याशी विद्वत्ताप्रचुर संभाषण करतील तर कधी आपल्या भावशील अंतरातून स्फुरणाऱ्या काव्यपंक्ती ओठांतून गुणगुणतील. एखाद्या विशाल वृक्षाचे सारेच अवयव सुंदर, मोहक व भव्य असतात. त्याची पाने हिरवीचार आणि पल्लेदार असतात; त्याची फळे मधुर असतात, त्याच्या शाखा उपशाखा विशाल असतात, त्याच्या भव्य आणि गर्द छायेखाली अनेकांना विसावा मिळतो. बसवेश्वर अशा विशाल वृक्षासारखे होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एकेक पैलू आता आपण पाहू या.

**कर्मयोगी बसवेश्वर :** बसवेश्वरांची कर्मयोगावर अपार श्रद्धा होती. म्हणूनच त्यांनी संन्यास घेतला नाही. प्रधानपद स्वीकारताना हीच दृष्टी त्यांनी समोर ठेवली होती. जे कार्य आपणास मिळाले ते तत्परतेने, तन्मयतेने करून सिद्धीस नेणे, कर्तव्य करताना स्वतःच कर्तव्यरूप होऊन

जाणे म्हणजेच कर्मयोग. अध्यात्मिक उन्नतीसाठी घरदार सोडून रानावनाचा आश्रय घ्यावा लागत नाही असे बसवेश्वरांचे मत होते. स्वत:च्याच उदाहरणाने त्यांनी हे सिद्ध करून दाखवले.

**धर्मोद्धारक बसवेश्वर :** असे म्हणतात की संगमेश्वराचा प्रसाद म्हणून महाम्बेला, हा शतगुणी पुत्र झाला. परमेश्वरानेच धर्मासाठी आणि अधर्मसंहारासाठी अवतार घेतला. बालपणापासूनच बसवेश्वरांचा धार्मिक विषयांकडे ओढा होता. मोठेपणी त्यांनी धर्मासाठी तनमनधनाची पर्वा केली नाही. पण धर्मप्रसाराचे वेळी सहिष्णुवृत्ति असणे आवश्यक आहे; हे बसवेश्वर वेळोवेळी सांगत आले आहेत. वीरशैव धर्माचे मुख्य ध्येय लिंगपूजा. या लिंगपूजेचे माहात्म्य बसवेश्वरांनीच समाजाला अधिकाधिक पटवून दिले. वीरशैव हा एक सनातन धर्म असून त्याचा उगम शिवोपासनेतून झाला आहे. ही गोष्ट पुन:पुन: ठासून सांगण्याचे काम बसवेश्वरांनी केले. प्रधानपदावर असतानाही शैवकार्यास त्यांनी क्रियाशील मदत केली. धर्माने मानवी समाजाची उन्नति व्हावी यादृष्टीने बसवेश्वरांनी धर्मोद्धाराचे कार्य हाती घेतले होते. पण त्यामध्ये अभिनिवेश टाळला होता. आपला मार्ग आपण भक्तिभावाने, श्रद्धेने, आणि तत्परतेने चालावा असे बसवेश्वर आपल्या अनुयायांना सांगत असत.

**समाजसुधारक बसवेश्वर :** सारा समाज हा एक आहे. माणसामाणसांत फरक नाही हे बसवेश्वरांनी वारंवार सांगितले. स्त्रीस्वातंत्र्याविषयी तर बसवेश्वरांचेच नाव आपणांस प्रामुख्याने घ्यावे लागेल. बसवेश्वर एके ठिकाणी विचारतात- "जीवनाचे ध्येय साधण्याचा अधिकार पुरुषांनाच का असावा? स्त्रियांना का असू नये?" धर्म, तत्व, समाज नीति या क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने संस्कार, अधिकार व स्वातंत्र्य असले पाहिजे याचा उद्‌घोष बसवेश्वरांनी अनेक वेळा करून त्याप्रमाणे अनेक ठिकाणी कृतीही घडवून आणली. बसवेश्वरांच्या काळी म्हणजे अगदी बाराव्या शतकातही अक्कनागम्मा, महादेवीअक्का, यांसारख्या अनेक स्त्रियांनी लिंगदीक्षा घेतली होती. ज्याकाळात स्त्रियांना

शूद्र मानले जात होते त्या काळातली ही गोष्ट! त्यामुळे ती अधिक महत्त्वाची मानली गेली पाहिजे.

उच्चनीच, स्पृश्य-अस्पृश्य असा भेदभावही बसवेश्वरांना मान्य नव्हता. 'भेदाभेद सर्व अमंगळ' असे आपले संत म्हणतात. बसवेश्वरांनी हीच गोष्ट आपल्या 'बसव-वचनांत' पुन:पुन्हा सांगितली. नुसते सांगून ते थांबले नाहीत तर रूढीप्रिय समाजाच्या विरोधाला न जुमानता हरळय्या-मधुवरसा हा स्पृश्य अस्पृश्य-विवाह त्यांनी मंजूर केला. समाजाचा जळजळीत विरोध सहन करण्याची धडाडी बसवेश्वरांजवळ होती. त्यामुळेच ते कोठेही डगमगले नाहीत की खचले नाहीत.

**कवी बसवेश्वर :** ज्याला समाजाविषयी व पर्यायाने मानवजातीविषयी प्रेम आहे. मानवाच्या सुखदु:खांशी जो एकरूप होऊ शकतो तोच समाजसुधारक होतो. आणि असाच सहृदय कवी होऊ शकतो. बसव-वचन-वाङ्मय हे अशाच प्रकारच्या तळमळीने व सदुपदेशाने ओतप्रोत भरलेले आहे. स्वत:कडे बसवेश्वर अत्यंत लीन भूमिका घेतात. ते म्हणतात-

**''मी सर्वांत लहान आहे**
**माझ्यापेक्षा लहान कोणी नाही.**
**सर्वात मोठे कोण असतील**
**तर ते शिवचरण होत.''**

मनुष्य-स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण बसवेश्वरांनी केले होते. मनुष्याच्या अंगच्या अनेक गुणदोषांची पारख त्यांना होती.

**''मनुष्यस्वभाव हा स्तुतिप्रिय आहे.''**

पण ''स्तुति म्हणजे सोन्याने मढविलेला गळफास'' असे बसवेश्वरांनी सांगून ठेवले आहे. मराठी संतांनी ज्याप्रमाणे संस्कृतच्या कडीकुलुपात अडकलेले अध्यात्म व तत्वज्ञान 'इथे मराठीचिये नगरी'त आणून सामान्य लोकांना त्याचा लाभ करून दिला, त्याप्रमाणेच बसवेश्वरांनी आपले तत्वज्ञान सांगताना मातृभाषेचाच वापर केला आहे. ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. बहुजन समाजाला आपणाला शिकवावयाचे असेल तर

बहुजन समाजाच्या भाषेचाच अवलंब केला पाहिजे, असा बसवेशांचा आग्रह होता. आणि म्हणूनच त्यांनी आपले सर्व विचार व तत्त्वे कानडी भाषेतच प्रकट केली. सत्य, शिव आणि सुंदर या तिन्हींचा संगम त्यांच्या बसव-वचनात आपणास दिसतो.

उपमा-अलंकार-दृष्टांत यांनी बसववचने समृद्ध आहेत.

उदा : निजैक्याविषयी बसव म्हणतात.

**जगास आंवरली तुझी माया**

**तुला आवरले मन माझे**

**तू जग जाणतोस; मी जाणतो तुला**

**आरशांत हत्ती मावल्यापरी**

**माझ्यांत मावलास कुडल संगम दे ।।**

काव्यगुणाबरोबरच बसवेश्वरांचा व्यासंगही दांडगा होता. बसवेशांची बहुश्रुतता ख्यातनाम होती. राजाच्या दरबारी बसवेश्वरांनी प्रवेश मिळविला तो आपल्या बुद्धिचातुर्यावरच होय. हे सांगणारी एक कथा प्रसिद्ध आहे-

बिज्जलाच्या दरबारात एक ताम्रपट होता. ताम्रपटावरील मजकूर अज्ञात होता. अनेकांनी त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्येकाला माघार घ्यावी लागली. बसवेश्वरांनी तो ताम्रपट सहज वाचून काढला. त्यात होती गुप्तधनाविषयी माहिती. या माहितीच्या आधारे राजाला अफाट संपत्ति मिळाली. राजा बसवेशांवर खूष झाला.

ही कथा आपणाला बसवेश्वरांचा व्यासंग किती बहुविध होता ते सांगते.

**तत्त्वज्ञानी बसवेश्वर :** बसवेश्वरांनी सांगितलेले तत्त्वज्ञान हे केवळ दुसऱ्यांसाठी नसून ते त्यांच्या स्वत:च्या आचरणातून आलेले होते. तत्त्वज्ञानाचा पाझर त्यांच्या पोटातून फुटला होता, केवळ ओठांतून नव्हे. उपासतापास, नियमन, व्रतवैकल्ये या बाह्य गोष्टींनी मानवाची शुद्धी होणार नाही. मानवाचे दिव्यत्व त्याच्या उदात्त जीवनांत सामावलेले असते. परमेश्वराचे विश्व आणि मानवाचे विश्व यांत फरक एवढाच की मानवाच्या विश्वांत सद्गुणांचा अभाव असतो तर परमेश्वराच्या

विश्वात फक्त सद्‌गुणांचेच प्राबल्य असते. म्हणून प्रेम आणि मृदुता यांच्या जोरावर मानवाने आपले जीवन जास्तीत जास्त उदात्त बनवीत गेले पाहिजे असे बसवेशांचे सांगणे असे.

बसवेश्वरांची शिकवण ही एकट्या शैवपंथीयापुरती मर्यादित नसून साऱ्या मानवजातीला चालना देणारी, अंधारातून प्रकाशाकडे नेणारी अशीच होती. शैवपंथ हे केवल निमित्त होते.

समाजाला परंपरेच्या घुसळखांबाला बांधून त्यावर स्वत:चे ताक घुसळणाऱ्या रूढीप्रिय माणसांविरुद्ध बसवेश्वरांनी बंडाचा झेंडा उभारला तो यामुळेच होय. कारण बसवेश्वरांना साऱ्या मानवजातीच्या-मानवतेच्या कल्याणाचा मार्ग साधावयाचा होता. यासाठी त्यांनी आपल्या रक्ताचे पाणी केले. जबाबदारीच्या जागा पत्करून तारेवरची कसरत केली. सखोल चिंतन आणि व्यासंग वाढविला. कर्मयोगाचा मार्ग अनुसरून समाजहितासाठी जास्तीतजास्त खटपट केली. कोलमडू पाहणाऱ्या शैव पंथाचा डोलारा धीरानं आणि नेटानं सावरला. नुसता सावरून ते थांबले नाहीत तर त्या डोलाऱ्याचे रुपांतर त्यांनी चिरस्थायी भक्कम आणि भव्य अशा मंदिरात करून टाकले. बसवेश्वरांचे जीवन हीच फार मोठी शिकवण आहे. त्यातून अनंत गोष्टी मिळण्यासारख्या आहेत. अनंत घेण्यासारख्या आहेत आणि म्हणूनच बसवेश्वरांची अवतारसमाप्ती होऊन आज शेकडो वर्षे लोटली, तरी स्वयंप्रकाशी ताऱ्याप्रमाणे त्यांची कीर्ती अजरामर आहे, जनतेची त्यांच्यावरील श्रद्धा अखंड आहे. त्यांच्या कीर्तीला कधीच ग्रहण लागले नाही, लागणार नाही.

■



## डॉ. न. म. जोशी

(M.A.M.Ed. Ph.D)

---

- लेखक, शिक्षणतज्ज्ञ व वक्ते
- माजी प्राध्यापक टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे.
- पुणे विद्यापीठ शिक्षणशास्त्र शाखा, ५५ पुस्तकांचे लेखक
- 'नि:स्पृह', 'प्रेषित', या चरित्रात्मक कादंबऱ्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र. ३ वेळा महाराष्ट्र शासनाचा उत्तम वाङ्मयनिर्मितीचा पुरस्कार, याशिवाय किर्लोस्कर फाउंडेशन, नाशिक सार्वजनिक वाचनालय, बालकुमार साहित्यसभा, कोल्हापूर, अशा अनेक संस्थांचे साहित्य पुरस्कार.
- (माजी) कार्यवाह - महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.
- (माजी) कोषाध्यक्ष - अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ.
- संस्थापक विश्वस्त - महर्षी शांडिल्य प्रतिष्ठान, पुणे.
- पुणे महापालिकेच्या वतीने उत्तम शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याबद्दल विशेष गौरव. सर्व वृत्तपत्रांतून सातत्याने बोधकथा.

- अनेक विद्यापीठांचे संशोधन तज्ज्ञ व मार्गदर्शक - शिक्षणशास्त्र शाखा.
- इंग्रजी, मराठी, हिंदी व सिंधी या चारही भाषांवर प्रभुत्व.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दोन खंडांचे मराठीत अनुवाद.
- अनेक सिंधी कथांची मराठीत भाषांतरे.
- निगडी, पुणे येथील १७ व्या अ.भा. 'बालकुमार साहित्य संमेलना'चे अध्यक्ष.
- पहिल्या कोयना साहित्य संमेलनाचे (पाटण, सातारा) अध्यक्ष.
- स्नेहांजली पुरस्कार २०१०
- नाट्यपरिषदेचा ज्येष्ठ रंगकर्मी पुरस्कार.
- महाराष्ट्र शिक्षणरत्न पुरस्कार.
- महाराष्ट्र मानवाधिकार पुरस्कार.
- 'डॉ. न. म. जोशी व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर डॉ. दिलीप गरुड यांनी पुणे विद्यापीठाची Ph.D. मिळवली आहे.

# वचने सर्वज्ञांची

ॐकाराला नाही मुख आकारही नाही त्याला
आकाशा जसे लपले परब्रह्म
ते कां दिसेना

मिळे तेवढेच जेवून, मिळे तेवढेच नेसून,
मिळे तेवढ्यातच (जागेत) झोपणाऱ्याला, जगांत
मिळेल निश्चित सुख

आज उद्या म्हणून रोज आणून साठवू नकोस
मौज कर मिळेल ते खाऊन, रोग आल्यास कण्हत
फजिती भोग

सर्व आशा सोडता, स्वर्ग येथेच पहा
सर्व आशेच्या भ्रमांत पडता, नरक तो
सर्वथा येथेच

अद्वैत झाल्यास, युद्ध कोणाशी?
बुद्धीने स्वत: जाणल्यास, जगांत
गुद्दागुद्दी नाही

क्षुद्र मानव तुम्ही अभद्र संसारात
पात्र मायेच्या मोहपाशांत
मात्र गुरफटतात

**(वचने सर्वज्ञांचीमधून साभार)**

EXIDE

HUNDEKARI AUTOMOBILES

**AMIT RUKARI**
M : 9890471881

**Exide Care**
408/1, Gultekadi, Swargate,
Pune-Satara Road, Pune - 411 037.
T : 020 - 24267182, 24272049
M : 7028021881
E : info@battrestore.com,
amitrukari@gmail.com

**Car Care & Repair Solution in :**
Interior Cleaning
Accidental Insurance Claim
Detailing & Polishing
Restoration & Painting

**Battery Care & Power Solution in :**
Automotive / Industrial /
SMF Battery Sales & Service
Inverter / UPS Sales & Service

**INDIA MOVES ON EXIDE**

***AUTO ADVISOR & CAR CARE CENTER***

वीरशैव ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभासदांना विशेष सवलत दिली जाईल...




मन-रंजन प्रकाशन, पुणे.